# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई

एम्.ए., पीएच् डी.

संचालक

कार्यालय क्र. : ०२० – २५६९७३४१
०२० – २५६२२६८८/८९

मोबाईल : ९८८१९०८०२०
०२० – २५६२२६९२


संदर्भ : रासेयो/२०२१/२३३ — दि. ११/०६/२०२१

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
संबधित महाविद्यालये/विभाग/परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे, अहमदनगर, नाशिक.

विषय : 'माझा गाव कोरोनामुक्त गाव' अभियानाबाबत

महोदय,

मा. राज्य संपर्क अधिकारी यांनी पाठविलेल्या पत्रानुसार महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री महोदय ह्यांनी "माझा गाव कोरोनामुक्त गाव" अभियानाचे आवाहन आपल्या सर्वांना केले आहे. हे अभियान केंद्र व राज्य शासनाच्या कोरोनामुक्ती संकल्पातील अनेक गोष्टींचा दुवा साधणारे समयोचित अभियान आहे. महाविद्यालयानी आपल्या कार्यक्षेत्रात असलेल्या गावांमध्ये 'माझा गाव कोरोनामुक्त गाव' ह्या अभियानाची सुरूवात करावी आणि जिल्हा समन्वयक, विभाग समन्वयक, कार्यक्रम अधिकारी व रासेयो स्वयंसेवक तसेच रासेयो माजी विद्यार्थ्यांच्या सहभागातून या अभियानास मूर्त स्वरूप द्यावे.

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत आपण आहोत आणि तरीही रासेयो स्वयंसेवक जिथे आहे तिथे राहून कोरोनामुक्तीचा कार्यक्रम आपल्या मार्गदर्शनाखाली तडीस नेत आहेत हे महत्त्वाचे आहे. आपल्या सर्वांच्याच अथक प्रयत्नातून राज्य व राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रीय सेवा योजनेला महत्त्वाचे स्थान प्राप्त होत आहे. तसेच आजवर जशी उपक्रमशीलता अबाधित ठेवली त्याच उर्जेतून "माझा गाव कोरोनामुक्त गाव" ह्या अभियानाची सुरूवात आपल्या महाविद्यालय परिक्षेत्रात करावी आणि हे अभियान प्रभावीपणे राबवून या उपक्रमाचा सविस्तर अहवाल व छायाचित्रासह **nss_student_list@pun.unipune.ac.in** या मेल आयडीवर (मेलचा विषय **"माझा गाव कोरोनामुक्त गाव"** या विषयासह) मेलद्वारे पाठवण्यात यावा. कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना